# यावल महाविद्यालयात जागतिक वन्यजीव सप्ताह साजरा

यावल (प्रतिनिधी) - येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान  महाविद्यालयात 2 ते 8 ऑक्टोबर या काळात जागतिक वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. याअंतर्गत प्राण्यांशी संबंधित विषयांना धरून विविध स्पर्धा घेण्यात आल्या ज्यामध्ये डिजिटल/ई- पोस्टर, प्रश्नमंजुषा, चित्रकला आणि रांगोळी स्पर्धा यांचा समावेश होता. या सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यार्थी, विद्यार्थिनी, अधिविभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, यांनी सहभाग नोंदविला.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात प्राणीसुरक्षेचे महत्व तसेच प्राणिजगताशी संबंधित सर्व समस्या जाणून घेण्याचा हेतू निर्माण व्हावा हा उद्देश होता. या उपक्रमात विद्यार्थ्यांबरोबरच महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचार्यांनीही उत्साहाने सहभाग नोंदवला. प्रश्नमंजुषा स्पर्धेत अनुक्रमे कु. अश्विनी विनोद पाटील, कु. यद्निका किशोर जावळे, कु. जयश्री प्रकाश धनगर यांनी प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकवला. डिजिटल पोस्टर स्पर्धेत यद्निका महाजन प्रथम तर नीरज पाटील यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. निखिल सुतार, गणेश पाटील चित्रकला स्पर्धेत अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय. निबंध लेखन स्पर्धेत पियूष वानखेडे प्रथम तसेच गणेश पाटील यांनी द्वितीय क्रमांक पटकावले.

या उपक्रमाचे योग्य नियोजन डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जीवशास्त्र विभागाचे प्राध्यापक मयूर सोनावणे, प्राध्यापिका मोहिनी पाटील आणि संगणक विभागाचे प्राध्यापक ईश्वरलाल पाटील यांनी केले होते.


EXPAND
IMAGES OF
EARTH...
Save
Wildlife


SAVE ANIMALS
WORLD WILD
LIFE DAY
FORESTS AND LIVELIHOODS:
SUSTAINING PEOPLE AND PLANET.


THE EARTH IS OUR HOUSE TOO


Name: Ganesh Puna Patil std:- 11th (sci)
email Id :- GP175061@gmail. com.